प्रतिष्ठेत,

प्रिय ------------------------------

आणि ------------------------------

(येथे विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांची नावे, आई आणि वडील दोहोंची नावे लिहून हा अंक त्यांना वाचावयास देणे.. वाचून दाखविणे.)

लेंड अ हँड इंडिया

# कृतीशील संवाद

शैक्षणिक वर्ष २०१५-१६ ● ऑगस्ट २०१५

(फक्त खाजगी वितरणासाठी)

Lend A Hand India

## मनोगत

## स्वतःची ओळख, आत्मविश्वास यांना 'साद'

**सुनंदा माने** (कार्यकारी संचालिका, लेंड अ हँड इंडिया, पुणे)

माध्यमिक स्तरापासून कौशल्य शिक्षणही गेल्या दोन-तीन वर्षांत जवळ - जवळ सर्वमान्य झालेली संकल्पना आहे. त्याच्याच जोडीने १0वी च्या विद्यार्थ्यांसाठी करिअर कौन्सेलिंग हा विषय देखील महत्वाचा मानला गेला आहे. त्या दृष्टीनेही शिक्षक-प्रशिक्षणाच्या माध्यमातून प्रयत्न सुरु आहेत. परंतु हे प्रयत्न पुरेसे नाहीत. बऱ्याच शाळांमधून असे प्रशिक्षित शिक्षक उपलब्ध नाहीत, विशेषतः ग्रामीण भागामध्ये असे शिक्षक उपलब्ध होणे अवघड होते.

या बाबतीत लेंड अ हँड इंडिया गेली दहा वर्षे सातत्याने कार्यरत आहे. उपलब्ध तज्ज्ञ तसेच साधन-सामुग्रीच्या सहाय्याने पुणे ग्रामीण परिसरातील सुमारे ५,००० विद्यार्थ्यांपर्यंत कल चाचणी आणि करिअर कौन्सेलिंगची सोय पोहोचवली आहे. पुण्यातील SCERT मधील तज्ज्ञांच्या सहाय्याने हा उपक्रम आजही राबविला जात आहे. उपक्रमाचा आढावा घेताना लक्षात आले की कल चाचणी व करिअर कौन्सेलिंगने विद्यार्थ्यांना फायदा होत आहे. पण त्याच्या जोडीने या विद्यार्थ्यांना जर स्पर्धा, नवनवीन संधी, व शाळेच्या मर्यादित जगातून महाविद्यालय, पॉलिटेक्निक, आयटीआय सारख्या मोठ्या विश्वात आत्मविश्वासाने प्रवेश करायचा असेल आणि आपला उद्देश साध्य करायचा असेल तर त्याला स्वतःची ओळख, उणीवा व त्यावर कशी मात करायची, आत्मविश्वास, विवेचन, स्वतःचे मत मांडण्याचे धाडस... हे सर्व देखील तितकेच गरजेचे आहे. पुढील शिक्षणाबद्दल मार्गदर्शन आणि मानसिक व बौद्धिक तयारी या दोन्हींची नितांत गरज आहे.

या विचाराने लेंड अ हँड इंडियाने २०१४-१५ मध्ये वरील बाबींचा विचार करून, तज्ज्ञ सल्लागारांच्या मदतीने 'साद' या प्रकल्पाची रचना केली. सहा शाळांमध्ये तो प्रायोगिक तत्वावर तो ५०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांसाठी सहा महिन्याच्या कालावधीत राबिवला गेला. परिणाम आश्चर्यजनक आणि सकारात्मक आहेत. सततच्या अन् वर्षअखेरीच्या परीक्षणानंतर तसेच लेंड अ हँड इंडियाच्या प्रायोगिक स्वरूपातील यशस्वी उपक्रमांचा प्रसार व प्रचार करणे या मुलतत्वाप्रमाणे, चालू शैक्षणिक वर्षातही 'साद' उपक्रम त्याच शाळांमध्ये सुरु आहे. त्यात या वर्षी शाळेतील सर्व शिक्षकांचाही समावेश केला आहे. शिक्षकांना ठराविक अंतराने एकूण १५ तासांचे प्रशिक्षण दिले जात आहे. पुढे जाऊन हे शिक्षक किंवा परिसरातील शैक्षणिक पात्रता असलेल्या व्यक्तींसाठी विशेष कोर्स तयार करून सादचे प्रशिक्षण देण्याचाही विचार आहे. त्यामुळे अनेक शाळांमध्ये 'साद' पोहोचू शकेल.

आपणा सर्वांचे सहकार्य आणि सहभाग अपेक्षित आहेच. साद उपक्रमात सहभागी शाळांच्या मुख्याध्यापकांनी, शिक्षकांनी व विद्यार्थ्यांनी त्यांचे अनुभव इतरांच्या माहितीसाठी जरूर पाठवावेत.




# उत्तम समन्वयातून आदर्श उपक्रम

महाबळेश्वर तालुक्यातील मेतकुताड येथील श्री साई विकास संस्था संचालित चेतन दत्ताजी गायकवाड विद्यालय येथे २०१४–१५ शैक्षणिक वर्षापासून लेंड अ हॅंड इंडिया द्वारा मल्टी स्किल फौंडेशन कोर्स आठवीसाठी शिकविण्यास सुरुवात झाली.

अत्यंत कमी कालावधीत सांघिक प्रयत्नांतून आदर्शवत ठरेल अशा प्रकारे हा उपक्रम राबविला जात आहे. मुख्याध्यापक **शिवाजी निकम** यांचा उत्साह आणि विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठीची त्यांची धडपड व आस उल्लेखनीय आहे. त्यांना संस्था पातळीवरही पूर्ण पाठिंबा मिळतोच शिवाय सहकारी शिक्षकांचेही उत्तम सहकार्य मिळते.



लेंड अ हॅंड इंडिया द्वारा महाराष्ट्रात जवळ–जवळ ७० शाळांमध्ये मल्टी स्किल फौंडेशन कोर्स राबविला जात आहे. चेतन दत्ताजी गायकवाड विद्यालय या तुलनेने नव्या शाळेची दखल घेण्याचे कारण म्हणजे, येथे विशेष आढळून आलेली बाब– MSFC चा गाभा असलेला मुद्दा :– विविध कौशल्ये शिकताना समजणारी, वापरली जाणारी कृती, प्रयोगामागील संकल्पना, तत्वे व शालेय अभ्यासक्रमात क्रमिक पुस्तकातून शिकविली जाणारी तत्वे यांचा संबंध जोडणे. उपक्रमाच्या पहिल्याच वर्षी सदर शाळेत MSFC उपक्रमाचे समन्वयक म्हणून काम करणारे विज्ञान शिक्षक **निलेश होमकर** सरांनी या बाबतीत उल्लेखनीय काम केले आहे. होमकर सरांनी अभ्यासक्रमाचा पुरेपूर वापर आपल्या विज्ञान–शिक्षणात करून घेतला आहे. शाळेमध्ये अत्यंत सुसज्ज आणि भरपूर जागा असलेली अशी प्रयोगशाळा आहे. शाळेत MSFC सुरु झाल्यावर विज्ञानाच्या तसेच गणिताच्या अनेकानेक संकल्पना प्रतिकृती (मॉडेल) च्या साहाय्याने उलगडून दाखविण्याचे त्यांनी प्रयत्न केले. MSFC च्या विविध विभागांशी समन्वय साधून त्यांनी मूळ संकल्पना समजावून सांगून त्यावर आधारित प्रतिकृती (मॉडेल) बनविण्यास विद्यार्थ्यांना सांगितले, त्यासाठी निदेशकांची मदत घेण्याचे सुचविले. त्याचा कच्चा आराखडाही दिला. यातूनच मग प्रकाश पेटी, वर्तुळ, सौर शुष्कक, जलपुनर्भरण, समान जल पातळी आदी प्रतिकृती तयार झाल्या. अशी अनेकानेक उपकरणे तयार केली आहेत आणि तीही कोणताही अधिकचा खर्च न करता, टाकाऊ पासून टिकाऊ या तत्वावर तयार केलीत! होमकर सरांच्या सांगण्यानुसार त्यांच्याकडे कल्पना होत्या पण त्या प्रत्यक्ष साकारण्यासाठी कौशल्य नव्हते, MSFC च्या उपक्रमामुळे त्यांच्या कल्पनांना कृतीशीलतेची जोड मिळाली.



बाजीराव मोरे (अभियांत्रिकी), प्रणीत शिंदे (ऊर्जा – पर्यावरण), अजित किरदक (शेती – पशुपालन), सरस्वती वाशिवले ( गृह – आरोग्य) असे चार निदेशक मेतकुताड शाळेत कार्यरत आहेत.

MSFC च्या विद्यार्थ्यांना आता अभ्यासाचे दडपण येत नाही तर आनंद वाटतो. सुरुवातीला नेहमीचे वेळापत्रक राबविता येत नव्हते मग रविवारी शाळा चालू ठेवली, नंतर रविवार ऐवजी शनिवारीच अर्ध्या दिवसाऐवजी थोडा अधिक वेळ दिला जाऊ लागला. शिक्षक, निदेशक, विद्यार्थी सर्वांनीच सहकार्य केले.

तालुका तसेच जिल्हा पातळीवर झालेल्या विविध स्पर्धांमध्ये प्रतिकृती पाठविण्यात आल्या, बक्षिसेही मिळाली. पाचगणी आणि महाबळेश्वर भागातील गरीब शेतकरी तसेच तेथील हॉटेल्समध्ये काम करणाऱ्या पालकांची मुले या शाळेत येतात. पावसाळ्यात अतिवृष्टीमुळे त्या भागातील बहुसंख्य शाळा बंद असतात, मात्र मेतकुताडची ही शाळा चालूच असते, दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी तर सकाळी आठ ते रात्री आठ अशी शाळा भरते, त्यात विशेष अभ्यास वर्ग घेतले जातात. गेली १४ वर्षे दहावीचा निकाल १०० टक्के लागला आहे.

चेतन दत्ताजी गायकवाड विद्यालयाचे अभिनंदन आणि शुभेच्छा!



# पोषक शाळा व जागरूक सुदृढ समाज

अशोका आणि लेंड अ हँड इंडिया या दोन संस्थांच्या संयुक्त सहकार्याने, २०१४-१५ या शैक्षणिक वर्षामध्ये पुणे, सातारा व सांगली येथील १४ शाळांमध्ये १,१०० विद्यार्थ्यांसाठी 'पोषक शाळा' हा प्रकल्प राबविण्यात आला. प्रकल्पाचा मुख्य उद्देश किशोरवयीन विद्यार्थ्यांत पोषक आहाराबद्दल जाणीव, जागृती करणे व त्यांच्या मदतीने घरापासून समाजापर्यंत पोषक आहाराचे महत्व व परिणाम या विषयी प्रसार करणे हा आहे. पोषक आहार प्रकल्पाच्या माध्यमातून १४ शाळांतील १,१०० विद्यार्थ्यांचा सखोल अभ्यास केला गेला, त्या शाळा -

- संत यादवबाबा माध्यमिक विद्यालय, शिंदवणे, पुणे
- ग्राम प्रबोधिनी विद्यालय, साळुंब्रे
- हुतात्मा उमाजी नाईक हायस्कूल, भिवडी, पुणे
- न्यू इंग्लिश स्कूल, धामारी, पुणे
- श्री भैरवनाथ विद्यामंदिर, पाबळ, पुणे
- श्री काळभैरव विद्यालय, वर्णे, सातारा
- श्री कोळेश्वर विद्यालय, तांदुळवाडी, सातारा
- विद्या विकास मंदिर, कळेढोण, सातारा
- भारतमाता विद्यालय, मायणी, सातारा
- वत्सलाबाई गुदगे कन्या प्रशाला, मायणी, सातारा
- सौ. सुमन फडतरे कन्या प्रशाला, रहिमतपूर, सातारा
- पेरेंट्स स्कूल, सातारा
- ज्ञानसंवर्धिनी विद्यालय, शिरवळ, सातारा
- माध्यमिक विद्यालय, बेणापूर, सुलतान गादे, सांगली

लेंड अ हँड इंडियाने यात सहभागी होण्यामागे इतरही अनेक उद्देश आहेत :- MSFC मधील अन्न प्रक्रिया विषयांतर्गत निदेशकांचे विशेष प्रशिक्षण, विविध कार्यशाळेच्या माध्यमातून वर्षभरात देशातील व परदेशातील पोषण विषयातील तज्ज्ञांच्या ज्ञानाचा फायदा घेणे, सर्वेक्षणातून माहिती गोळा करणे व विविध उपकरणे हाताळण्यास शिकणे, शाळेतील विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण करून पालकांपर्यंत पोषक आहाराबद्दल विशेष कार्यशाळेच्या माध्यमातून त्याबद्दल माहिती पोहोचवणे व MSFC अंतर्गत आहार, अन्न प्रक्रिया या विषयाची शास्त्रोक्त हस्तपुस्तिका तयार करणे.

उपक्रमाचाच एक भाग म्हणून एक 'पोषण' टूलकिट तयार करण्यात आले आहे, ज्याचा उद्देश शाळकरी मुलांना त्यांच्या स्वतःच्या आणि आपल्या कुटुंब व सभोवतालच्या समाजात पोषक आहारावरून जागरुकता आणणे हा आहे. हे टूलकिट पुणे व सातारा येथील



**सुनंदा माने यांच्या हस्ते पोषण टूलकिटचे वितरण होताना**

कार्यशाळांमध्ये दिनांक २१-२३ जुलै २०१५ रोजी सादर करण्यात आले होते. टूलकिट प्रभावीरीत्या कसे वापरावयाचे याचे सखोल प्रशिक्षण निदेशकांना देण्यात आले.

टूलकिट म्हणजे एक खोका असून त्यात रंगीत खेळ, छोट्या पुस्तिका आणि तक्ते यांद्वारे भारतातील कुपोषित मुलांच्या प्रमुख मुद्द्यांवर अभ्यासपूर्ण माहिती पुरविली आहे. माहिती पुरविताना ती रंजक कशी होईल, विद्यार्थ्यांमध्ये कुतूहल निर्माण होऊन विषयाची उत्सुकता कशी वाढेल याकडे विशेष लक्ष देण्यात आले आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाचे टूलकिट पण मराठीत! खेळांच्या साहाय्याने कृतीशीलतेचा समावेश असल्यामुळे दीर्घकाळ लक्षात राहील असे पोषण विषयक प्रबोधन करण्यात आले आहे. दैनंदिन व्यवहारातील आचरणात रुजेल असा आहार विचार परिणामकारक सांगण्यात आला आहे.

टूलकिट मध्ये विविध वस्तू आहेत. मित्र आणि शत्रू खेळ (आहारातील कोणत्या संवयी मैत्रीपूर्ण आहेत आणि कोणत्या नाहीत याची जाणीव करून देणारा खेळ), पहचान कौन?(हा सांघिक खेळ आहे) असे नाविन्यपूर्ण खेळ आहेत.

टूलकिटचे वाटप १४ शाळांना केले गेले. सदर टूलकिटचा वापर फक्त MSFC उपक्रमातील विद्यार्थ्यांसाठीच नव्हे तर पाचवी ते दहावी पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना याचा उपयोग होणार आहे.

या प्रकल्पाचा मुख्य उद्देश लोकांना पैसे किंवा इतर वस्तूंची सरळ मदत करण्याऐवजी कुपोषणापासून परावृत्त करण्यासाठी सक्षम बनविणे हा आहे.

सदर टूलकिट शाळेमध्ये एक वर्ष वापरले जाईल व शेवटी सर्वेक्षण करून मुलांवरील झालेला परिणाम याची माहिती घेतली जाईल.

# जागतिक युवा कौशल्य दिन : १५ जुलै

Skill India
कौशल भारत - कुशल भारत

तांत्रिक, व्यावसायिक शिक्षणाचे महत्व अधोरेखित करण्यासाठी तसेच स्थानिक व जागतिक अर्थव्यवस्थेला पूरक अशा इतर कौशल्यांचा विकास साधण्यासाठी मोठ्या प्रमाणावर जागरूकता निर्माण होणे शिवाय चर्चादेखील होणे आवश्यक आहे. हीच उद्दिष्ट्ये ठेवून संयुक्त राष्ट्रांद्वारे नोव्हेंबर २०१४ मध्ये १५ जुलै हा दिवस 'जागतिक युवा कौशल्य दिन' म्हणून जाहीर करण्यात आला असून त्यानुसार २०१५ मध्ये प्रथमच 'जागतिक युवा कौशल्य दिन' साजरा झाला.

या दिवसाचे औचित्य साधून नवी दिल्ली येथे एका विशेष समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या समारंभात भारताचे पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी 'राष्ट्रीय कौशल्य विकास आणि उद्योजकता धोरण' लागू केले. तसेच राष्ट्रीय कौशल्य विकास अभियान', 'प्रधानमंत्री कौशल विकास योजना', 'कौशल्य ऋण योजना' आदी योजनांची सुरुवात करण्यात आली. या समारंभास लेंड अ हँड इंडियाचे सह–संस्थापक, श्री. राज गिल्डा निमंत्रणावरून हजर होते.

पुणे महानगरपालिकेच्या निवडक दहा माध्यमिक शाळांमध्ये NSQF अंतर्गत मल्टी स्किल फौंडेशन कोर्स (MSFC) व रिटेल (लेवल–१ आणि लेवल–२) हा व्यवसायलक्षी पायाभूत अभ्यासक्रम लेंड अ हँड इंडियाच्या सहकार्याने शिकविला जातो. या सर्व शाळांमध्ये बुधवार, दिनांक १५ जुलै रोजी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करून प्रथम 'जागतिक युवा कौशल्य दिन' साजरा करण्यात आला. नवी दिल्ली येथील कार्यक्रम सर्व शाळांमध्ये LIVE दाखविण्यात आला.

लेंड अ हँड इंडियाद्वारा स्वाधीन प्रकल्पांतर्गत येणाऱ्या सातारा जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये तसेच गुजरात मधील कच्छ येथील शाळा येथे देखील हा दिवस साजरा केला गेला.




सातारा जिल्ह्यातील स्वाधीन प्रकल्पातील सर्व शाळांनी १५ जुलै 'जागतिक युवा कौशल्य दिन' साजरा केला. सर्व शाळांनी पालक, गावातील पदाधिकारी, प्रतिष्ठीत व्यक्ती आणि इतर मान्यवर यांना आमंत्रित करून त्यांच्या समवेत हा दिन साजरा केला. या विशेष दिनाच्या कार्यक्रमामुळे कौशल्य आधारित शिक्षणाचा प्रसार आणि प्रचार होण्यास मदत झाली आहे. या कार्यक्रमास उपस्थित असणाऱ्या सर्व व्यक्तींनी MSFC अभ्यासक्रमाबाबत चांगल्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत.

सातारा शहरातील कार्यक्रमास जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक श्री. एन. एल. थाडे, उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) श्रीमती शबनम मुजावर, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी शी. पी. व्ही. कदम तसेच पेरेंट स्कूलच्या मुख्याध्यापिका श्रीमती स्नेहा टाकेकर आदी उपस्थित होते.

## लेंड अ हँड इंडियातील नवीन सहकारी

लेंड अ हँड इंडियाच्या कार्याची वाढ आणि विस्तार होत आहे. अलीकडेच काही नवीन सहकारी लेंड अ हँड इंडियाच्या टीम मध्ये सामील झाले आहेत :–

१) राहुल भंडारे, प्रकल्प अधिकारी (सातारा)
२) अमोल लोखंडे, क्षेत्र अधिकारी (सातारा)
३) लव्हू भोसले, क्षेत्र अधिकारी (मुंबई)
४) प्रशांत सोनावले, प्रकल्प अधिकारी NSQF (पुणे)
५) वैभव गवाणे, प्रकल्प समन्वयक (सातारा)

# शिक्षण मंथन : लेंड अ हँड इंडिया द्वारा मासिक शैक्षणिक अभ्यास गट

लेंड अ हँड इंडियाचे कार्यालयीन तसेच क्षेत्रीय कर्मचारी, पदाधिकारी, हितचिंतक आणि लाही व्यतिरिक्त, समाजातील शिक्षणतज्ज्ञ, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, लेखक, कलावंत आदींसाठी पर्यायी शिक्षण पद्धतीवर माहितीचे आदान–प्रदान करण्याचे सुलभ व्यासपीठ उपलब्ध असावे या हेतूने 'शिक्षण मंथन' हा मासिक शैक्षणिक अभ्यास गटाचा उपक्रम सुरु करण्यात आला आहे. महिन्याच्या चौथ्या गुरुवारी संध्याकाळी एकत्र जमून शिक्षणातील विविध प्रवाह, प्रयोग, दखलपात्र अभिनव उपक्रम, शासनाचे शिक्षण धोरण – काही नवीन निर्णय – होऊ घातलेले बदल यांची नोंद घेणे, शिक्षण विषयक पुस्तकांवर चर्चा असे चर्चात्मक स्वरूप शिक्षण मंथनचे आहे. सुरुवातीस अर्धा ते पाऊण तास मान्यवरांची मांडणी/मुलाखत आणि त्यानंतर अर्धा ते पाऊण तास खुली चर्चा अशा प्रकारे एक ते दीड तास कार्यक्रम चालतो.

शिक्षण मंथनची पहिली बैठक गुरुवार, दिनांक २५ जून २०१५ रोजी आयोजिली होती आणि यात 'नारी समता मंच' या संस्थेचे प्रकल्प व्यवस्थापक श्री. अरुण लोहकरे यांनी 'कातकरी खेळघर' या प्रकल्पाविषयी माहिती दिली. याचवेळी सदर प्रकल्पाशी सबंधित डॉक्यूमेंटरीही दाखविण्यात आली.



**शिक्षण मंथनच्या पहिल्या कार्यक्रमात बोलताना अरुण लोहकरे**

कातकरी ही महाराष्ट्रातील आदिम आणि अस्तित्व धोक्यात आलेली जमात असून त्यांच्या मुला–मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी पुणे जिल्ह्यातील मुळशी तालुक्यात ९ कातकरी वस्त्यांवर खेळघर प्रकल्प चालविला जातो. मुलं एकत्र येतात.. गप्पा, गाणी, गोष्टी आणि अभ्यास होतो... यातून मुलांची शाळा, शिक्षण याची गोडी वाढू लागली. शाळा गळती रोखावी आणि शिकणे आनंददायी व्हावे या उद्देशाने सुरु केलेल्या खेळघरातील मुले आता कॉलेज, व्यावसायिक शिक्षण घेऊ लागली आहेत. कामाच्या शोधात कातकरी स्थलांतरित होत असतात. त्यामुळे मुलांच्या शिक्षणात खंड पडू नये म्हणून कातकरी वस्त्यांमध्ये 'आश्रयघरे' सुरू केली आहेत.

जुलै महिन्याचे शिक्षण मंथन, श्री. दत्तात्रय रा. सकट यांच्याद्वारे झाले. पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यातील कर्डेलवाडी येथील जिल्हापरिषदेची शाळा ३६५ दिवस चालू असते!!!!! आणि हो ही निवासी अथवा आश्रम शाळा नाही. तरीदेखील तेथील विद्यार्थी–विद्यार्थिनी वर्षभर शाळेत येतात. सदर शाळा ISO प्रमाणित आहे!! मुख्याध्यापक श्री. दत्तात्रय रा. सकट आणि त्यांच्या शिक्षिका पत्नी श्रीमती बेबीनंदासकट, हे समर्पित जोडपे ही शाळा चालवितात.

नुसते शिक्षण नाही तर संस्कारीत शिक्षण द्यायला हवे, विद्यार्थ्यांना ज्ञानार्थी बनवायचे, यासाठी सोमवार ते शनिवार पाठ्यपुस्तक शिकविण्याच्या कसरतीमध्ये हे सारे शक्य नव्हते. यातूनच रोज शाळा, सुट्टीला सुट्टी देणे ही संकल्पना आकारली. सुरुवातीला खूप कमी उपस्थिती असे.. मात्र इतर दिवशी चालणाऱ्या उपक्रमांनी विद्यार्थ्यांत जसा फरक दिसू लागला तस–तशी अनुपस्थित मुलेदेखील सुट्टीच्या दिवशी उपस्थित राहू लागली.

रविवार व अन्य सुट्ट्यांच्या दिवशी विद्यार्थ्यांचा अभ्यास घेण्याऐवजी त्यांच्या कलागुणांचा विकास कसा होईल याकडे लक्ष पुरविले जाते. सांस्कृतिक, व्यक्तिविकास, क्रीडा, शिष्यवृत्त्या, विविध स्पर्धा यांचाच विचार प्रामुख्याने केला जातो. विद्यार्थ्यांना सर्वार्थाने सक्षम करण्याचा हा प्रयत्न आहे.

शिक्षण मंथन उपक्रमाचे कार्यक्रम स्थळ असते : पुसाळकर हॉल, लाला लजपतराय विद्यार्थी भवन, विद्यार्थी सहाय्यक समिती,पँटालून्सच्या मागे, शिवाजी हौ. सोसायटी, ऑफ सेनापती बापट मार्ग, पुणे–४०० ०१६.

शिक्षण मंथन बैठकांविषयीची सविस्तर माहिती पुढील ब्लॉगवर वाचता येईल :
https://bloglendahandindia.wordpress.com/category/shikshan-manthan



**खुल्या चर्चेत आपले अनुभव सांगताना सुमन करंदीकर**

*हे करून पहा..*

# घरातलं सूक्ष्मदर्शक यंत्र

प्रत्येकाच्या घरात एक सूक्ष्मदर्शक यंत्र असतंच पण ते कोणी वापरतच नाही. ते वापरण्यासाठी अजिबात पैसे खर्च करावे लागत नाहीत किंवा त्याची काळजी घेण्यासाठी काही विकतही आणावे लागत नाही. खरं म्हणजे अनेकांना माहितच नाही की आपल्या घरातल्या फळीवर आपणच एक सूक्ष्मदर्शक यंत्र ठेवलेले आहे.

घरातल्या या सूक्ष्मदर्शक यंत्रांने काय काय पाहता येईल?

- ❑ छोटी मुंगी किंवा इटुकला डास दहापट मोठा करून पाहताना त्यांची शारीरिक रचना समजून घेता येईल.
- ❑ वेगवेगळ्या फुलांच्या पाकळ्यांवरच्या सूक्ष्म रेषा अगदी स्पष्ट पाहताना हे ही लक्षात येईल की, प्रत्येक फुलावरच्या प्रत्येक पाकळीवरच्या रेषा अगदी वेगळ्याच आहेत.
- ❑ आपल्याच काय पण प्रत्येकाच्या बोटांवरच्या रेषा पूर्णत: वेगवेगळ्या आहेत हे सहज शोधता येईल.
- ❑ चष्मा हरवला तर वर्तमानपत्रातील बारीक अक्षरे मोठी करून आरामात वाचता येईल.


खरेतर ही यादी खूप वाढवता येईल. पण माझा तुमच्या सर्जनशीलतेवर विश्वास आहे. आणि तुम्ही मला कळवणार आहात की तुम्ही त्यातून काय–काय पाहिलंत ते.

हां तर आता घरातली एक काचेची गोल बाटली घ्या (सुमारे १० इंच ऊंच असेल अशी).. ही बाटली पाण्याने काठोकाठ भरा. बाटलीत अजिबात हवा राहणार नाही याची काळजी घ्या. मग झाकण घट्ट बंद करा. झाले आपले सूक्ष्मदर्शक यंत्र तयार. आता वर्तमानपत्रावर बाटली आडवी ठेवा.. पहा काय दिसते?

असे का होते?

मध्यभागी फुगीर आणि कडेला निमुळते होत गेलेले भिंग हे बहिर्गोल भिंग असते. या भिंगामुळे सरळ रेषेत जाणारा प्रकाशकिरण वाकवला जातो. आणि हे बहिर्गोल भिंग प्रकाशकिरण एकत्रित करते. पण भिंगाच्या मध्यातून जाणारा किरण मात्र वाकत नाही. तो सरळ रेषेत आरपार जातो. बहिर्गोल भिंगातून वस्तूची प्रतिमा मोठी दिसते. या ठिकाणी पाण्याचा थेंब हा बहिर्गोल भिंगासारखा असतो. त्यामुळे पाणी भरलेली गोल बाटली जर डोळ्यासमोर धरली तर पलीकडचे सर्व मोठे दिसते.

**– राजीव तांबे**
rajcopper91@gmail.com




**लेंड अ हँड इंडिया**

९, जीवन विहार हौसिंग सोसायटी, प्राईड पॅनोरमा जवळ, ऑफ सेनापती बापट मार्ग,
पुणे, महाराष्ट्र – ४११ ०१६. दूरध्वनी : (०२०) २५६३ ००९२, ९५५२२ ४१९०५.

E-mail : lahi@lend-a-hand-india.org | www.lend-a-hand-india.org

Lend A Hand India